५८

**गौण खनिजावरील राजशुल्काच्या परताव्यासंदर्भाने निविदा नमुना "ब १" मधील खंड ३६ व निविदा नमूना "क" मधील खंड २० मध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ०२/०५/(२९१)/इमारती २
मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक :- ११/९/२००३.

**वाचा :** १) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एमएमआर १०८३/२०/१७७२, दिनांक २१ फेब्रुवारी,१९८३.
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि १०८८/४३३/३५९२/ख, दिनांक १८ ऑक्टोबर,२००१.

**प्रस्तावना :**

महसूल व वन विभागाच्या दि.२१.२.८३ च्या शासन निर्णयास अनुसरून प्रचलित पध्दतीनुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणाऱ्या रस्ते व इमारती इत्यादींच्या बांधकामांसाठी ठेकेदारांना आवश्यक असणारे गौण खनिज (काळा दगड/जांभा दगड/वाळू/मुरुम/माती इत्यादा) कत्राटदारानी आवश्यक ती रक्कम महसूल खात्याकडे अनामत रक्कम म्हणून भरुन महसूल खात्याची परवानगी घेऊन उत्खनन करुन कामासाठी वापरावयाचे आहे आणि असे गौण खनिज शासकीय कामासाठी वापरल्याचे कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केल्यानंतर महसूल विभागाने कत्राटदारानी भरलेली अनामत रक्कम त्यांना परत करावी अशी तरतूद आहे.

गौण खनिजाचा अनधिकृत वापर टाळण्यासाठी व शासनाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून महसूल व वन विभागाने संदर्भाधीन दि.१८.१०.२००१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कामासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन शुल्क/अनामत रक्कम परताव्यासंबंधीच्या महसूल व वन विभागाच्या क्रमांक एमएमआर/१०८३/२०/१७७२, दिनांक २१/२/१९८३ च्या शासन निर्णयातील या सर्व तरतूदी व प्रचलित पध्दती बंद करुन शासकीय कामासाठी लागणाऱ्या गौण खनिजावर राजशुल्क आकारणी करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

सध्या प्रचलित असलेल्या निविदा नमूना ब १ मधील खंड ३६ व निविदा नमूना क मधील खंड २० नुसार शासकीय कामासाठी वापरलेल्या गौण खनिजासाठी महसूल विभागाकडे भरलेल्या राजशुल्काचा परतावा कंत्राटदाराला करणे आवश्यक ठरते. महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक १८/१०/२००१ नुसार आता शासनाने शासकीय कामासाठी वापरावयाच्या गौण खनिजावरसुध्दा राजशुल्क आकारणी अनिवार्य केली असल्यामुळे सर्व कंत्राटदाराना गौण खनिजाच्या वापरासाठी राजशुल्क महसूल विभागास अदा करणे अनिवार्य झाले आहे. महसूल व वन विभाग कंत्राटदाराने भरलेली राजशुल्काची रक्कम कंत्राटदारास परत करणार नसल्याने, निविदा नमुना ब १ मधील खंड ३६ व निविदा नमूना क मधील खंड २० मध्ये सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या पार्श्वभूमीवर आता खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

निविदा नमुना ब-१ मधील खंड ३६ मध्ये व निविदा नमुना क मधील खंड २०मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी **"All quarry fees, royalties, octrci dues and ground rent for stacking materials, if any, shall be paid by the contractor."**

९०



हे आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. सदरील शासन निर्णय पाटबंधारे विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४७६, दिनांक २/६/२००३ महसूल व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४६, दिनांक ३/७/२००३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७३४, दिनांक २४/७/२००३ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( प्र. य. देशमुख )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर,
मुख्य वनरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभागातील सर्वअधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभागातील सर्व कार्यकारी अभियंता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, सिडको, नवी मुंबई, वाशी,
सर्व वनसंरक्षक,
साखर संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे ९,
आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई,
आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर,
आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर,
प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर,
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
प्रशासक, कल्याण महानगरपालिका, कल्याण,
सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
व्यापार व वाणिज्य व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
महसूल व वन विभागातील ज-१, ज-२, ज-३, ज-४, ज-५, ज-६, ज-७ कार्यासने निवड नस्ती, ख कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

* * * * *